0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-** १) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई यांचेकडून दिनांक २४/०७/२०१२ रोजीच्या पत्रासोबत प्राप्त झालेले कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४६/२०१२/जा.५१७, दिनांक ३०/०७/२०१२ व २३/०८/२०१२.

३) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक ०४/०९/२०१२ रोजीचे लेखी अभिवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४६/२०१२/जा. ६६०
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : २५/०९/२०१२.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

### आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक १९/०७/२०१२ रोजी यलोगेट पोलिस ठाणेचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक श्री. ढोके यांनी २०:०० वाजताचे सुमारास गुन्हे प्रकटीकरण कक्षात काम करणारे पो.ना.क्र. २४७०७ दत्ताराम गोविंद शिंदे, पोलिस हवा. क्र. ८१७०, पोलिस नाईक क्र. २६६८, २५६५९ यांना त्यांच्या कक्षात बोलावून वाशी खाडी पुलाजवळील गणपती विसर्जन पॉईटजवळ संध्याकाळच्या सुमारास एक बोट बेवारस स्थितीत मिळून आल्याबाबत पोलिस नियंत्रण कक्षाकडून संदेश प्राप्त झाल्याचे सांगून सदर बोटी संदर्भात शहानिशा करणेसंबंधाने समक्ष त्या ठिकाणी जाऊन खात्री करण्याबाबत कळविले. त्यानंतर वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांचे ओदशानुसार गुन्हे प्रकटीकरणात काम करणारे वरील अंमलदार असे त्यांच्याकडील मोटार सायकलीने वाशी खाडी पुलाजवळील मानखुर्द कडील गणपती विसर्जन पॉईटजवळ जाऊन पाहिले असता, सदर ठिकाणी समुद्र किनाऱ्यालगत खाडीच्या भागात एक वरील बाजूने बंद असलेली लाईफ बोटीसारखी फायबरची बोट सदर विसर्जन पॉईटवरील व खाडी पुलावरील विद्युत दिव्यांच्या प्रकाशात तेथे उभी असलेली दिसून आली. त्याचप्रमाणे तेथे मानखुर्द पोलिस ठाण्याची मानखुर्द वायरलेस मोबाईल क्र. २ हि सदर बोटीवर पाहाऱ्याकरीता उभी होती. सदर वायरलेस मेबाईलवरील पोलिस कर्मचाऱ्याकडे चौकशी

करता वरील पथकास असे समजले की, सदर विसर्जन पॉईटच्या ठिकाणी असलेल्या पोलिस चौकीतील कर्तव्यावर असलेले पोलिस नाईक क्र. १६८६०, नेमणूक मानखूर्द पोलिस ठाणे हे दुपारी १५:४५ वाजताचे सुमारास नैसर्गिक विधीसाठी जवळील खाडीच्या भागात गेले असता, त्यांना सदरची बोट ही खाडीतील झुडपात दिसून आली. त्यांना सदर बोटीवर कोणीही इसम उपस्थित असल्याचे न दिसून आल्याने त्यांनी दुरध्वनीवरुन त्याबाबत मानखूर्द पोलिस ठाणेस कळविले असता, पोलिस ठाणेमार्फत पुर्व प्रादेशिक नियंत्रण कक्षास सदरची बोट त्या ठिकाणी बेवारस स्थितीत उभी असलेबाबत कळविण्यात आले असे समजले. वरील पथकाने सदर बोटीजवळ जाऊन त्यांच्याकडील बॅटरीच्या झोतात सदर बोटीचे झाकण उघडून पाहिले असता, आतील भाग पोकळ दिसून आला व त्यात डिझेल सारखा पेट्रोलजन्य पदार्थ असल्याचे दिसून आले. तसेच सदर बोटीस इंजिन नसल्याचेही दिसले. त्यास अनुसरुन वरील पथकातील पोलिस हवा. ८१७०/हाके यांनी दुरध्वनीवरुन त्यांच्या वरिष्ठांना माहिती दिली. वरिष्ठांकडून सदरची बोट ताब्यात घेऊन चौकशीकामी पोलिस नौकेच्या मदतीने मॅलेट बंदर येथील बोट गेट जेट्टी या ठिकाणी आणण्याबाबत पथकास आदेशित करण्यात आले.

त्यानंतर दिनांक २०/०७/२०१२ रोजी ००:३० वाजताचे सुमारास समुद्रास भरती आल्यानंतर त्याठिकाणी अबोली व पंचगंगा या पोलिस नौका आल्या. सदर नौकांच्या मदतीने वरील प्रमाणे बेवारस स्थितीत मिळून आलेली बोट ही टोचन करुन दिनांक २०/०७/२०१२ रोजी सकाळी ०६:३० वाजताचे सुमारास बोट गेट जेट्टी येथे आणून उभी करण्यात आली. वरिष्ठांचे मार्गदर्शनानुसार सदर बोटीचे दिवसाच्या उजेडात निरीक्षण करुन गुन्हे प्रकटीकरण अधिकारी सपोनि चिपकर यांनी वरील पथक व पंचासमक्ष पंचनामा केला असता सदर बोटीमध्ये तिच्या तळाशी एकूण ४४०० लिटर डिझेल सारखा पेट्रोलजन्य पदार्थाचा साठा मिळून आला. त्यामधुन प्रत्येक एक लिटर या प्रमाणे एकूण चार प्लॅस्टिकच्या बाटल्यांमध्ये रासायनिक तपासणीकरीता सॅम्पल घेण्यात आले असून ते जागीच पंच व पोलिसांच्या सह्यांचे लेबल लावून सिल करुन ताब्यात घेण्यात आले आहे. त्याचप्रमाणे सदर बोटीतील पेट्रोलजन्य पदार्थात सुमारे तीन इंच रुंदीचा १५ ते १८ फुट लांबीचा हिरव्या रंगाचा प्लॅस्टिकचा पाईप तरंगत असताना दिसून आल्याने तो सदरची बोट व त्यामध्ये मिळून आलेल्या डिझेल सारख्या पेट्रोलजन्य पदार्थासह ताब्यात घेण्यात आले आहे.

सदरची बोट हि फायबरची असून सध्या पावसाळी हवामान असल्याने ती समुद्राच्या पाण्यात हेलकावे खावून बाजूच्या बोटीस अथवा धक्क्याच्या भिंतीस किंवा समुद्र तळात असलेल्या खडकावर आपटुन फुटण्याची शक्यता असल्याने त्यात मिळून आलेला पेट्रोलजन्य द्रवपदार्थ हा गळून जावू नये या दृष्टीने पंचासमक्ष पंचनामा चालू असताना इंजिनचा पंप लावून जेट्टीच्या किनाऱ्यावर ठेवलेल्या एकूण २२ लोखंडी ड्रममध्ये भरण्यात आलेला असून त्यावरुन सदरचा डिझेल सारखा पेट्रोलजन्य पदार्थाचा एकूण साठा ४४०० इतका लिटर असल्याचे दिसून आले. सदरची बोट ही कोणाच्या मालकीची आहे, याबाबत पथकाने गोपनियरित्या चौकशी केली असता, ती हेमंत

विनायक नाखवा याची असल्याचे पथकास समजले. सदर हेमंत नाखवा हा माझगाव मुंबई येथील कासार गल्लीत राहावयास असून तो डिझेल सारखा पेट्रोलजन्य पदार्थ अवैधरित्या मिळवून त्याचा बेकायदेशिर साठा करण्यात कार्यरत आहे. याची पथकातील अधिकाऱ्यास माहिती होती. त्याच्या विरुध्द यलोगेट पोलिस ठाण्यास गुन्हा नोंद असल्याने ते त्यास ओळखतात.

अशाप्रकारे सदरची बोट ही बेवारस स्थितीत मिळून आली असून वरील एकंदर परिस्थितीवरुन सदर बोटीचा मालक हेमंत विनायक नाखवा व त्याच्याकडे बोटीवर काम करणाऱ्या इसमांनी डिझेल सारखा पेट्रोलजन्य पदार्थ स्वतःचे फायद्याकरीता अवैध मार्गाने मिळवून बेकायदेशिररित्या सदर ज्वालाग्राही पदार्थाचा सदर बोटीमध्ये साठा केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३ व ७ तसेच २) भा. द. वि. चे कलम २८५ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १७/२०१२, दिनांक २०/०७/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन सदर फायबरची लाईफ बोट, बोटीतील डिझेल सारखा पेट्रोलजन्य पदार्थ, एक प्लॉस्टिकचा पाईप इत्यादी असे मिळून एकूण १,६२,३००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

प्रस्तुत गुन्ह्यातील आरोपी व फायबर बोटीचा मालक नामे हेमंत विनायक नाखवा यास पोलिसांनी अटक केल्यानंतर पंचांसमक्ष निवेदन पंचनामा करुन त्यानुसार दिनांक २२/०७/२०१२ रोजी अटक आरोपी हेमंत नाखवा याने पंचासमक्ष कथन केले की, पाच दिवसापूर्वी तो व नमूद गुन्ह्यातील त्याचे सोबतचे साथीदार गौतम मंडळ व मनोजकुमार सरकार यांनी मिळून त्याच्या मालकीच्या बोटीतून ॲकरेन एरिया समुद्रात जाऊन तेथे उभा असणारा काळ्या लाल रंगाचे टगातील कर्मचाऱ्यांना सिगारेट पॅकेटस व दारु देऊन त्याच्या बदल्यात त्यास टगातील डिझेल त्याच्या छोट्या बोटीत घेतले व ते डिझेल आणून त्याच्या दुसऱ्या छोट्या फायबर बोटीत साठा करुन ठेवले व सदरची छोटी फायबर बोट मानखूर्द वाशी खाडी पुलाच्या बाजूस खाडीत झुडपात लपवून ठेवली. सदरच्या फायबर बोट व त्यातील ४४०० लिटर डिझेलसह यलोगेट पोलिसांनी पकडले असून ते वरील गुन्ह्यात पोलिसांनी जप्त केले आहे. त्या फायबर बोटीत डिझेल ठेवण्याकरिता व त्यास टोविंग करण्याकरिता वापरलेली बोट ही त्याच्या मालकीची असल्याचे सांगून त्याने सदर बोट कोळसाबंदर या ठिकाणी धक्क्यालगत लावली असल्याचे सांगून सदर बोट त्याने पोलिस पथक व पंचांसमक्ष दाखवून दिली. त्यानुसार पोलिसांनी सदरची रुपये ४०,०००/- किंमतीची बोटही पंचांसमक्ष जप्त केली आहे व नमूद गुन्ह्यात पोलिस पथकाने जप्त केलेल्या मुद्देमालाचे तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | एक फायबरची लाईफ बोट | १ नग | ३०,०००/- |
| २ | बोटीतील डिझेल सारखा पेट्रोलजन्य पदार्थ | ४४०० लिटर | १,३२,०००/- |
| ३ | एक प्लॉस्टिकचा पाईप | १ नग | ३००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | एक फायबरची लाल रंगाची इंजिन असलेली बोट | १ नग | ४०,०००/- |
| | | एकूण | २,०२,३००/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई यांनी वाचावे क्र. १ मध्ये नमूद अहवालान्वये केली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक २१/०८/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक २१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी हे उपस्थित राहिले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता पुढील सुनावणी दिनांक ०४/०९/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०४/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस यलोगेट पोलिस ठाणे येथील सहाय्यक पोलिस निरिक्षक तथा तपासी पोलिस अधिकारी श्री एम. बी. चिपकर हे उपस्थित राहिले व त्यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचे वाचावे क्र. ३ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तसेच सुनावणीचे वेळी तपासी पोलिस अधिकारी यांनी सदरहु बोटीचे काहीच पुरावादर्शक कागदपत्रे नसल्याचे सांगुन त्यामधील जप्त डिझेलचा साठा संपूर्णत: बेकायदेशीर असल्याचे तपासात आढळुन आले असल्याचे सांगितले. सदर सुनावणीस बोटीचे मालक म्हणुन हेमंत विनायक नाखवा, मनोजकुमार सृष्टीचरन सरकार व गौतम बलराम मंडल हे उपस्थित राहीले व त्यांना काहीही सांगावयाचे नसल्याचे सांगुन निवेदन अथवा बोटीबाबत कोणतेही पुरावादर्शक कागदपत्रे सादर करण्यास असमर्थ असल्याचे सांगितले.

सबब, प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखुन ठेवण्यात आले.

**<u>युक्तीवाद</u> :-**

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई यांनी सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या लेखी अभिवेदनात, सदरची बोट व त्यातील जप्त माल हा आरोपी हेमंत नाखवा व त्याच्या साथीदारांनी काढल्याचे व साठा केल्याचे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाल्याने नमुद आरोपीतांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली असता सदरची बोट हेमंत नाखवा यांच्या मालकीची असुन त्यांच्या सांगण्यावरुन यातील जप्त डिझेल काढण्यात आले असल्याचे यातील अटक आरोपी मनोजकुमार सृष्टीचरन सरकार व गौतम बलराम मंडल यांनी सांगितले व सदरहु प्रमाणे गुन्हयाची कबुली दिली. तरी हेमंत विनायक नाखवा व त्याचे साथीदार यांनी ४४००

लिटर डिझेल एवढी मालमत्ता स्वत:च्या लाभाकरीता अवैध मार्गाने मिळवून बेकायदेशीररित्या बोटीत साठा केल्याने गुन्हा नोंद करण्यात आला. यातील बोटीच्या मालकाने बोटीतील तेलाबद्दल तसेच बोटीबाबतही कोणत्याही प्रकारची कागदपत्रे सादर केली नाही. तसेच नजीकच्या काळात पावसाळी अधिवेशनाच्या निमीत्ताने कायदा व सुव्यवस्था राखणेकामी बरेचशे मनुष्यबळ पोलिस ठाण्याच्या बाहेर जात असल्याने सदर जप्त मुद्देमालाची देखरेखीकरीता फारच जिकरीचे होत आहे. तरी सदरच्या मुद्देमालाकडून एखादी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने वरील बाबींचा विचार करुन सदर प्रकरणामधील सर्व मुद्देमाल अथवा त्यामधील डिझेलचा साठा याची विल्हेवाट करण्याचे योग्य ते आदेश लवकरात लवकर होण्यास विनंती असल्याचे नमुद आहे.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक १९/०७/२०१२ रोजी यलोगेट पोलिस ठाणेचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांच्या पथकास पोलिस नियंत्रण कक्षाकडून संदेश प्राप्त झाले की, वाशी खाडी पुलाजवळील गणपती विसर्जन पॉईटजवळ संध्याकाळच्या सुमारास एक बोट बेवारस स्थितीत मिळून आली असल्याने सदर बोटी संदर्भात शहानिशा करणेसंबंधाने त्यांच्या अधिपत्याखालील पथकाने वाशी खाडी पुलाजवळील मानखुर्द कडील गणपती विसर्जन पॉईटजवळ जाऊन पाहिले असता, सदर ठिकाणी समुद्र किनाऱ्यालगत खाडीच्या भागात एक वरील बाजूने बंद असलेली लाईफ बोटीसारखी फायबरची बोट सदर विसर्जन पॉईटवरील व खाडी पुलावरील विद्युत दिव्यांच्या प्रकाशात तेथे उभी असलेली दिसून आली. त्यांना सदर बोटीवर कोणीही इसम उपस्थित असल्याचे न दिसून आल्याने त्यांनी दुरध्वनीवरुन त्याबाबत मानखूर्द पोलिस ठाणेस कळविले. वरील पथकाने सदर बोटीजवळ जाऊन त्यांच्याकडील बॅटरीच्या झोतात सदर बोटीचे झाकण उघडून पाहिले असता, आतील भाग पोकळ दिसून आला व त्यात डिझेल सारखा पेट्रोलजन्य पदार्थ असल्याचे दिसून आले. सदरची बोट ताब्यात घेऊन चौकशीकामी पोलिस नौकेच्या मदतीने मॅलेट बंदर येथील बोट गेट जेट्टी या ठिकाणी आणण्याबाबत पथकास आदेशित करण्यात आले. त्यानंतर दिनांक २०/०७/२०१२ रोजी सदर बोटीचे दिवसाच्या उजेडात निरीक्षण करुन गुन्हे प्रकटीकरण अधिकारी सपोनि चिपकर यांनी वरील पथक व पंचांसमक्ष पंचनामा केला असता सदर बोटीमध्ये तिच्या तळाशी एकूण ४४०० लिटर डिझेल सारखा पेट्रोलजन्य पदार्थाचा साठा मिळून आला. सदरची बोट ही हेमंत विनायक नाखवा याची असल्याचे पथकास समजले. सदर हेमंत नाखवा हा डिझेल सारखा पेट्रोलजन्य पदार्थ अवैधरित्या मिळवून त्याचा बेकायदेशिर साठा करण्यात कार्यरत असल्याचे व त्याच्या विरुध्द यलोगेट पोलिस ठाण्यात यापूर्वीही गुन्हा नोंद

असल्याचे पथकास आढळून आले. सदरची बोट ही बेवारस स्थितीत मिळून आली. प्रस्तुत गुन्ह्यातील आरोपी व फायबर बोटीचा मालक नामे हेमंत विनायक नाखवा यास पोलिसांनी अटक केल्यानंतर त्याने पंचासमक्ष कथन केले की, पाच दिवसापूर्वी तो व नमूद गुन्ह्यातील त्याचे सोबतचे साथीदार गौतम मंडळ व मनोजकुमार सरकार यांनी मिळून त्याच्या मालकीच्या बोटीतून अॅकरेन एरिया समुद्रात जाऊन तेथे उभा असणारा काळ्या लाल रंगाचे टगातील कर्मचाऱ्यांना सिगारेट पॅकेटस व दारु देऊन त्याच्या बदल्यात त्यास टगातील डिझेल त्याच्या छोट्या बोटीत घेतले व ते डिझेल आणून त्याच्या दुसऱ्या छोट्या फायबर बोटीत साठा करुन ठेवले व सदरची छोटी फायबर बोट मानखूर्द वाशी खाडी पुलाच्या बाजूस खाडीत झुडपात लपवून ठेवली. सदरच्या फायबर बोट व त्यातील ४४०० लिटर डिझेलसह यलोगेट पोलिसांनी पकडले असून ते वरील गुन्ह्यात पोलिसांनी जप्त केले आहे. त्या फायबर बोटीत डिझेल ठेवण्याकरिता व त्यास टोविंग करण्याकरिता वापरलेली बोट ही त्याच्या मालकीची असल्याचे सांगून त्याने सदर बोट कोळसाबंदर या ठिकाणी धक्क्यालगत लावली असल्याचे सांगून सदर बोट त्याने पोलिस पथक व पंचांसमक्ष दाखवून दिली. वरील एकंदर परिस्थितीवरुन सदर बोटीचा मालक हेमंत विनायक नाखवा व त्याच्याकडे बोटीवर काम करणाऱ्या इसमांनी डिझेल सारखा पेट्रोलजन्य पदार्थ स्वत:चे फायद्याकरीता अवैध मार्गाने मिळवून बेकायदेशिररित्या सदर ज्वालाग्राही पदार्थाचा सदर बोटीमध्ये साठा केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करुन मुद्देमाल जप्त करण्यात आला.

प्रस्तुत गुन्हयातील जप्त बोटीचे मालक म्हणुन हेमंत विनायक नाखवा, मनोजकुमार सृष्टीचरन सरकार व गौतम बलराम मंडल यांनी सुनावणीस उपस्थित राहुन त्यांना काहीही सांगावयाचे नसल्याचे सांगुन निवेदन अथवा बोटीबाबत कोणतेही पुरावादर्शक कागदपत्रे सादर करण्यास असमर्थ असल्याचे सांगितले. यावरुन जप्त दोन्ही बोटीचे मालक व इतर आरोपी यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त मुद्देमाल परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येते. तसेच तपासी पोलिस अधिकारी यांनी सुनावणीचे वेळी केलेल्या खुलाशात, सदरहु बोटीचे काहीच पुरावादर्शक कागदपत्रे नसल्याचे सांगुन त्यामधील जप्त डिझेलचा साठा संपूर्णत: बेकायदेशीर असल्याचे तपासात आढळुन आले असल्याचे सांगुन सदरची बोट हेमंत नाखवा यांच्या मालकीची असुन त्यांच्या सांगण्यावरुन यातील जप्त डिझेल काढण्यात आले असल्याचे यातील अटक आरोपी मनोजकुमार सृष्टीचरन सरकार व गौतम बलराम मंडल यांनी सांगितले व सदरहु प्रमाणे गुन्हयाची कबुली दिली. तरी हेमंत विनायक नाखवा व त्याचे साथीदार यांनी ४४०० लिटर डिझेल एवढी मालमत्ता स्वत:च्या लाभाकरीता अवैध मार्गाने मिळवून बेकायदेशीररित्या बोटीत साठा केल्याचे सांगितले आहे. यावरुन प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या बोट मधील



000

जप्त करण्यात आलेला एकुण ४४०० लिटर डिझेलचा साठा हा गैरमार्गाने व बेकायदेशीररित्या विनापरवाना मिळविल्याचे सिध्द होत असल्याने सदरचा संपूर्ण डिझेलचा साठा अवैध असल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, नमुद गुन्हयात जप्त करण्यात आलेला डिझेलचा संपूर्ण बेकायदेशिर साठा रासायनिक पृथ:करण अहवालाच्या अधिन राहून शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी, हया गुन्हयातील जप्त बोटीचे मालक हेमंत विनायक नाखवा यांनी बेकायदेशीररित्या मिळविलेला डिझेलचा साठा हा त्यांच्या फायबर बोटीमध्ये बेकायदेशिररित्या खरेदी करुन विनापरवाना साठवणूक केले असल्याचे स्पष्ट झाले असून या गैरव्यवहाराकरीता उक्त फायबर बोटीचा गैरवापर त्यांच्या संमतीने होत असल्याचे निष्पन्न झाले आहे. उक्त दोन्ही बोटीचे मालक म्हणुन हेमंत विनायक नाखवा याने केलेल्या खुलाशात सदरच्या दोन्ही बोटींचे त्यांचेकडे कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे नसल्याचे सांगितले असुन यावरुन त्यांनी सदरच्या बोटी बेकायदेशीररित्या विनाकागदपत्रांचे खरेदी करुन त्यामध्ये तस्करीमार्गाने इतर आरोपींशी संगनमत करुन विनापरवाना व बेकायदेशीररित्या मिळविलेल्या डिझेलची वाहतूक, साठवणूक व अवैध विक्री करण्याकरीता सदर बोटींचा गैरवापर केला असल्याचे सिध्द होत आहे. प्रकरणी, सदर फायबर बोटीचे मालक हेमंत विनायक नाखवा हे सराईत गुन्हेगार असुन त्यांना सदरच्या नोंदणीकृत नसलेल्या तसेच विनापुरावादर्शक कागदपत्रे असलेल्या दोन्ही फायबरच्या बोट प्रत्येकी बाजारमुल्याएवढी रक्कम भरुन बोटीचे मालक हेमंत विनायक नाखवा यांना परत दिल्यास ते सदर दोन्ही बोटींचा तस्करी कारवाईमध्ये पुन्हा गैरवापर करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, जप्त करण्यात आलेली फायबर लाईफ बोट व फायबरची लाल रंगाची इंजीन असलेली बोट या दोन्ही बोटींची जाहिर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १७/२०१२, दिनांक २०/०७/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**आदेश :-**

१) जप्त करण्यात आलेल्या फायबर बोटीमधील संपुर्ण एकूण ४४०० लिटर्स डिझेलचा साठा शासनजमा करण्यात यावा.

२) सदर साठ्याची पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार वैध परवानाधारकांस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

0008 ३) जप्त करण्यात आलेली एक फायबरची लाईफ बोट व एक फायबरची लाल रंगाची इंजीन असलेली बोट या दोन्ही बोटी शासनजमा करण्यात येत आहे. सदर दोन्ही बोटींची पोलिसांनी जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

४) घटनास्थळी जप्त करण्यात आलेला एक प्लास्टिकचा पाईप शासनजमा करण्यात यावा. सदर पाईपची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सहि/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) फायबर लाईफ बोटीचा व फायबरची लाल रंगाची इंजिन असलेल्या बोटीचा मालक
हेमंत विनायक नाखवा

२) गौतम बलराम मंडल, बोटीवरील काम करणारा इसम

३) मनोजकुमार सृष्टिचरण सरकार, बोटीवरील काम करणारा इसम

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस स्टेशन, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

~~३)~~ निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.